Publication: Nav Shakti
Edition: Mumbai
Date: Tuesday, 13th May, 2014

# जुलैपासून ई-पॉलिसी सुरू होणार!

**नवी दिल्ली, दि. १२ (वृत्तसंस्था)** - जुलै महिन्यापासून जीवन विमा पॉलिसी घेतल्यावर त्याबाबतची कागदपत्रे सांभाळण्याची आवश्यकता भासणार नाही. विमा नियामक मंडळ (इर्डा) च्या आदेशानुसार जीवन विमा क्षेत्रातील कंपन्या जुलै महिन्यापासून सर्व पॉलिसी डिजिटल स्वरुपात दाखल करणार आहेत. यासाठी या सर्व कंपन्या लवकरच करार करणार आहेत.

काही दिवसांपूर्वीच जीवन विमा कंपन्या आणि इर्डा यांच्या बैठकीत १ जुलैपासून सर्व पॉलिसी डिजिटल स्वरुपात सुरू करण्यावर सहमती झाली आहे. इर्डाने सर्व कंपन्यांना स्पष्ट केले आहे, की याविषयी रिपॉजिटरीबरोबर करार करणे आवश्यक आहे. विमा रिपॉजिटरी सिस्टीम उद्घाटन मागील वर्षी सप्टेंबरमध्ये अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी केले होते. ज्या पाच रिपॉजिटरींना इर्डाने मंजुरी दिली होती त्यामध्ये डाटाबेस मॅनेजमेंट, सेंट्रल इन्शुरन्स रिपॉजिटरी, एसएचसीआयएल प्रोजेक्ट, सीएएमएस रिपॉजिटरी सर्व्हिसेस आणि कार्वी इन्शुरन्स लिमिटेडचा समावेश आहे.

ई-पॉलिसी सुरू झाल्यानंतर पॉलिसीधारकांना पॉलिसींची सर्व कागदपत्रे सांभाळणे आवश्यक ठरणार नाही. विमा पॉलिसी रिपॉजिटरीमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सुरक्षित असणार आहे. ज्या पद्धतीने समभाग डीमॅट खात्यात असतात, त्यानुसारच विमा पॉलिसी घेणाऱ्याचे एक रिपॉजिटरी खाते असणार आहे.

सध्या रिलायन्स लाईफ इन्शुरन्स, इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्स या कंपन्यांनी ५ रिपॉजिटरींबरोबर केला आहे. एलआयसीलासुद्धा रिपॉजिटरीबरोबर करार करणे आवश्यक आहे. रिलायन्स लाईफचे सीईओ अनुप राऊ यांनी सांगितले, की ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक्स स्वरुप विमा प्रदान करणे ही पद्धती योग्य असून कंपनीने ५ रिपॉजिटरीबरोबर करार केला आहे.